ॐ
# ज्ञान प्रबोधिनी
सौर चैत्र १९४१ चे
## मासिक वृत्त
सौर वैशाख १, शके १९४१ दि. २१/४/२०१९

### मा. संचालकांचे प्रश्नोत्तर-रूप चिंतन

**प्रश्न :** ‘सर्वसाधारण प्रबोधिनीपणा’च्या गुणांमध्ये ‘आपले काम दुसऱ्यावर नाही’ या शब्दांमध्ये स्वावलंबन हाच गुण वेगळ्या शैलीत सांगितला आहे ना?

**उत्तर :** स्वतःच्या दैनंदिन व्यवहारामध्ये कोणावर अवलंबून राहायला लागू नये या साठी आपले आरोग्य, आपला उदरनिर्वाह, आपले शिक्षण, आपले मनोरंजन, या बाबतीत स्वावलंबी असणे चांगलेच. प्रवास, बाजारहाट, बँक व्यवहार, शासकीय कार्यालयांमधली कामे, ही सर्व स्वतःची स्वतः करता येणे चांगलेच. स्वावलंबनापासून सुरुवात होते. पण ‘आपले काम दुसऱ्यावर नाही’ मध्ये एवढाच मर्यादित अर्थ नाही.

आपले शेजारी, आपल्या गावातले, दूरच्या गावातले, यांच्यावर काही संकट आले, तर अजून ते संकट माझ्यावर आले नाही म्हणून स्वस्थ बसणे, त्या संकटाकडे दुर्लक्ष करणे म्हणजे ‘मला काय त्याचे’ ही वृत्ती. या वृत्तीमुळेच आपल्या राष्ट्रावर अनेक संकटे आली आहेत. इतरांवरचे संकट हे माझ्यावरचे संकट असे मानून ते दूर करण्याची जबाबदारी माझीच आहे, इतर ती जबाबदारी मानोत किंवा न मानोत, असे मानणे म्हणजे ‘आपले काम दुसऱ्यावर नाही’ ही वृत्ती. असे केवळ संकटाच्या वेळीच वागायचे असते असे नाही.

सध्या सार्वत्रिक निवडणुका चालू आहेत. जगातील तात्कालिक सार्वजनिक व्यवस्थापनाचे हे सर्वात मोठे उदाहरण आहे. निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार लाखो लोक आपली नित्याची कामे सोडून एक दिवसापासून तीन महिन्यांपर्यंत देशभर विविध ठिकाणी निवडणुका यशस्वी व्हाव्यात म्हणून काम करत असतात. इथेही प्रत्येकाने ‘आपले काम दुसऱ्यावर नाही’ या पद्धतीने काम केले तरच निवडणुका व्यवस्थित पार पडतील.

या आठवड्यातच कृष्णविवराचे पहिले छायाचित्र प्रसिद्ध झाले आहे. जगभर पसरलेल्या आठ दुर्बिणींनी एकत्रितपणे निरीक्षण करून ते छायाचित्र तयार झाले. कोणत्याही एका दुर्बिणीतून ते छायाचित्र काढता आले नसते. आठही ठिकाणी काम करणारे खगोलशास्त्रज्ञ व संगणकतज्ज्ञ यांनी एकत्र काम केल्यामुळे ते छायाचित्र काढता आले. या सर्वांनी आपापले काम योजनेप्रमाणे करून तो प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण केला. प्रत्येकाने ‘आपले काम दुसऱ्यावर नाही’ म्हणजे ‘गटातले माझ्या वाट्याचे काम मीच केले पाहिजे’ या पद्धतीने काम केले. या वृत्तीमध्ये सर्वसाधारण प्रबोधिनीपण आहे.

अमेरिकेहून परतल्यावर कोलंबोपासूनच्या विजययात्रेत विवेकानंदांनी मदुराई येथे मिळालेल्या मानपत्राला उत्तर देताना ‘आपले काम दुसऱ्यावर नाही’ याचे सुरेख विश्लेषण केले आहे. ते म्हणतात, ‘‘स्वतः जवळ जे काही चांगले असेल ते भावी पिढीच्या हाती सुपूर्त करून सर्व देशांमध्ये सुसंवाद निर्माण करण्याचे, एक आदर्श जग निर्माण करण्याचे युगांचे स्वप्न साकार करण्यास प्रत्येकाने हातभार लावला पाहिजे .......... उद्याच ती अवस्था येईल अशा कल्पनेने व ती आपल्याच परिश्रमांवर अवलंबून आहे असे समजून प्रत्येकाने काम केले पाहिजे. ...... जगातील इतर प्रत्येकाने आपले कार्य पार पाडले असून, जगाला पूर्णता प्राप्त करून देण्याचे उर्वरित कार्य आपल्यालाच करावयाचे आहे. आपण घ्यावयाची जबाबदारी ही अशा स्वरूपाची आहे.’’ स्वतःहून अशासारखा विचार करून आपली संघटना, समाज किंवा राष्ट्रसंबंधीचे आपले कर्तव्य पार पाडत राहणे म्हणजे ‘आपले काम दुसऱ्यावर नाही’ ही वृत्ती.

गिरीश श्री. बापट
संचालक

### अभिनंदन
#### UPSC अंतिम निकाल २०१८

सौर चैत्र १५ (५ एप्रिल) रोजी UPSC परीक्षेचा निकाल जाहीर झाला. केंद्रातील पंधरा विद्यार्थी विविध प्रशासकीय सेवेसाठी निवडले गेले आहेत. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे ---

| | |
|---|---|
| १) स्नेहल धायगुडे | ९) विक्रम वीरकर |
| २) अक्षय अग्रवाल | १०) प्रतीक खामटकर |
| ३) मनोज महाजन | ११) शुभम ठाकरे |
| ४) नचिकेत शेळके | १२) सचिन पवार |
| ५) निखिल राखेचा | १३) अर्चना वानखडे |
| ६) क्षितीज तवरेज | १४) जयेश आहेर |
| ७) सागर काळे | १५) चंद्रशेखर घोडके |
| ८) ऋजुता बनकर | |

### युवक विभाग, पुणे
#### वर्षांत समारंभ व प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रम

सौर चैत्र १७ (७ एप्रिल) रोजी युवक विभागाचा वर्षांत समारंभ झाला. वर्षांत उपासना, शालेय मार्गदर्शकांच्या वार्षिक नियुक्त्या, भवितव्य लेख टप्पा २ मधील निवडक मुद्द्यांचा आढावा असे वर्षांताचे स्वरूप होते. सुमारे १०० युवक आणि मार्गदर्शक तसेच ४० शालेय विद्यार्थी उपस्थित होते. ५१ शालेय मार्गदर्शकांच्या वार्षिक नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. वर्षांता नंतर लगेचच प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रम झाला. चौदा युवकांनी प्रथम तर सात युवकांनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली. शुभंकर केळकर याने तृतीय प्रतिज्ञा घेतली. यानंतर मा. संचालकांनी सर्वांना मार्गदर्शन केले. खुमासदार शैलीमध्ये युवक व त्यांचे प्रश्न हे कसे सोडवत जायचे याबद्दल त्यांनी भाष्य केले.



(उपक्रमांची प्रकाशचित्रे पान क्र. ७ वर)

## *ज्ञान प्रबोधिनी, अंबाजोगाई*

**युवक गट :** सौर चैत्र २१ ते २३ (११ ते १३ एप्रिल) या तीन दिवसात मुलांसाठी व्यक्तिमत्त्व विकसन शिबिर झाले. सकाळी १० वाजता उपासना, परिचय होऊन शिबिराची सुरुवात झाली. पहिल्या सत्रात श्री. नामदेव दादा गुंडाळे यांनी विज्ञान कसे शिकावे? त्यात विज्ञानाची सुरुवात कुठून होते? यापासून ते अनेक गोष्टींवर मार्गदर्शन केले. त्यानंतर गटकार्य झाले. त्यात मुलांचे गट करून मुलांनी नाटक बसवले व सादरीकरण केले. पुढच्या सत्रात किरणदादा राऊतमारे यांनी जुन्या पत्रिकांपासून भेट कार्ड कसे तयार करायचे हे शिकवले व प्रत्येक मुलांनी ते तयार केले. प्रसन्न व गौरव दादा यांनी बुद्धिविकासचे खेळ घेतले. या नंतर पद्य व प्रबोधिनीची प्रार्थना घेऊन शिबिराचा पहिला दिवस झाला.

दुसऱ्या दिवशी उपासना, उपासनेमुळे होणारे फायदे, हे वीर विवेकानंद पद्य व स्मरणशक्ती वाढवण्याचा खेळ घेतला. अभिजीत दादा जोंधळे यांनी पुस्तक कसे वाचावे, पुस्तक आपल्याला काय सांगतात हे कवितेतून सांगितले व मुलांनी कोणती पुस्तके वाचावी हे सांगितले. गटकार्यात फळभाज्यांपासून विविध आकार बनवले. त्यात मुलांनी घर, समुद्रातील जहाज, गणपती असे अनेक आकार बनवले व आपल्या गटातील अनुभव सांगितले. 'गलत मत कदम उठा ओ', हे पद्य घेतले व त्यानंतर साखळी कार्य केले. दोन गट करून बादलीतून पाणी घेऊन ओंजळीने बाटली भरायची. टरबुजाची लागवड, पिकाचा कालावधी, ते कधी लावतात, त्याच्या जाती, त्यासाठी कोणती जमीन आवश्यक आहे व त्याचे प्रकार इथपासून ते प्रत्यक्ष खाण्यापर्यंतचा आनंद मुलांनी घेतला. ताकदीचे खेळ घेऊन मुलांना आपली क्षमता कळली.

शिबिराचा तिसरा आणि शेवटचा दिवस. यात तीन दिवस झालेल्या नियोजनाप्रमाणे सर्व उपक्रम झाले. उपासनेनंतर पद्य व दत्तप्रसाद दादानी कल्पनाशक्ती कशी वाढवावी हे प्रत्यक्ष गटकार्यातून शिकवले. यात मुलांनी उत्तम कल्पना सुचविल्या व त्या कशा सुचल्या हे सुद्धा गटप्रमुखानी सांगितले.

'जुतां', '१०० रुपीस' व 'गणपती' हे तीन लघुचित्रपट मुलांना दाखवले. या तिन्ही चित्रपटात वेगळेपण होते. एक कन्नड भाषेत, दुसरा आवाज नसलेला व तिसरा फक्त संगीत असलेला. त्यात अभिजीतदादांनी नेमके चित्रपट कोणते पाहावेत, चित्रपटातून काय बोध घ्यावा हे सांगितले. या तीन चित्रपटातून काय कळाले व त्यातून आपण काय शिकलो हे दादांनी विचारलं व मुलांनी चांगल्या प्रकारे उत्तरे दिली. शेवटी सर्व मुलांनी शिबिराच्या तीन दिवसातील आपले अनुभव व शिबिरात शिकलेल्या गोष्टी सांगितल्या. सर्व दादांनी त्यांना शिबिर घेताना आलेले अनुभव, गंमती-जमती व पुढच्या शिबिराच्या उपक्रमाबद्दल माहिती दिली आणि मुलं आपापल्या घरी गेली. शिबिरात एकूण ३० मुलांनी सहभाग घेतला.

**युवती विभाग :** सौर चैत्र १७ (७ एप्रिल) रोजी युवती गटाचे, एक दिवसीय उन्हाळी शिबिर ९.०० ते ६.०० या वेळेमध्ये गोविंद केंद्रावर घेण्यात आले. या शिबिरात एकूण २८ मुली होत्या. एकूण तीन सत्रात शिबिर पार पडले.

पहिले सत्र ९ ते ११ - या सत्राची सुरुवात पद्य घेऊन करण्यात आली, त्यानंतर प्रथम मुलींचा परिचय, प्रबोधिनी म्हणजे काय?, त्यानंतर १०.१५ ते ११.१० प्रसाद दादाचे मार्गदर्शन झाले. (मेंदू कसा विकसित होतो, संघटन म्हणजे काय? ते कसे करावे, व काही खेळातून संघटन कसे करावे हे शिकवले). सत्र दुसरे १२.०० ते २.३० या सत्रामध्ये मुलींना एका मिनिटात बांगडया व सेफ्टि पिंनचा उपयोग करून माळ तयार करणे, हा खेळ घेतला. व गटात सर्व मुलींनी मिळून एकत्र फुगे फुगवणे व ते दोघींनी मिळून ते फुगे बसून फोडणे. त्यानंतर सर्व मुलींनी क्राफ्ट आर्ट केले. या मध्ये योगितताईने व दिव्याताईने मुलींना कागदाचा ससा तयार करायला शिकवला.

सत्र तिसरे ३.३० ते ६.०० - या सत्रामध्ये ३.३० ते ४.३० शोध खजिन्याचा, या नंतर मुलींना गटकार्य कसे करावे ह्या साठी दोन मिनिटात करंगळीने गोटी घेऊन ती पुढे बोटानी द्यायची, व ती गोटी मग मध्ये टाकणे. यामध्ये एकूण तीन गटाने हे खेळ खेळले. त्यानंतर शिबिराबद्दलचे मुलींचे अनुभव कथन झाले. व प्रार्थनेने शिबिराचा शेवट झाला.

## *ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर*

स्नेहसंमेलनाचे बदलते स्वरूप म्हणजे स्नेहमेळावा. मूल वर्षभरात शाळेत येऊन काय करते याचे कुतुहल हे पालकांना असतेच. हसत खेळत शिक्षण घेता घेता मुलांनी आत्मसात केलेल्या कलाकौशल्याचे सादरीकरण पालकांसमोर करतांना यावर्षी तीन मोठ्या कार्यक्रमातून स्नेहमेळावा संपन्न झाला. विज्ञानदिनाचे औचित्य साधून छोट्या मोठ्या गटातील मुलांनी विज्ञान प्रयोग करून दाखवले. नंतर संपन्न झाली गंमतजत्रा. वर्षभरात मुलांनी केलेला अभ्यास, खेळ, हस्तकौशल्य, साहित्य हाताळणी, पंचज्ञानेंद्रियांच्या विकासासाठी योजलेले पाठ हे सर्व जेव्हा मूल आपल्या पालकांना समजावून सांगताना पालकांच्या उपस्थितीत बालकांचे मूल्यमापन होत होते. लेखनकामा शिवाय अभ्यास कसा करता येतो हे जाणवले. वर्षभरात आत्मसात केलेली बालगीते, बडबडगीते, अभिनयगीते, नाटुकले छोट्या गटाने सादर केले. मोठ्या गटातील मुलांनी बारा विविध गीतांवर सादरीकरण केले. पाठांतर, प्रार्थना, नाट्य सादरीकरण व भारूड असे स्वरूप होते तर छोट्या गटातील मुलांनी पु. ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांनी लिहिलेल्या गीतावर नृत्य सादर केले. आ. लताताईंनी लिहिलेल्या छोट्यांची शाळा या संगीतिकेचे सादरीकरण झाले.

मूल म्हणजे भूमीपोटचे अंकूर कोवळे कोवळे ।।     प्रत्येकाचे रूप आणि रंग वेगळे वेगळे ।।
हवी त्यांना ऊब, हवा वारा आणि पाणी ।।     हवी त्यांना दोस्ती हवी आनंदी गाणी ।।

हे पालकांना मनोमन पटले. असा हा स्नेहमेळावा मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात संपन्न झाला.

## नैसर्गिक संसाधने विकास विभाग

**विहीर लोकार्पण कार्यक्रम :** कांबरे बुद्रुक (ता. भोर) येथे बांधून पूर्ण झालेल्या नळपाणी योजनेचे उद्घाटन केपीआयटीचे अध्यक्ष रवी पंडित यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून केपीआयटीचे निर्मला पंडित, अनुप कांबळे, सीएसआर प्रमुख तुषार जुवेकर तसेच पोलीस पाटील नथुराम सुकाळे, जगन्नाथ स्वामी व सुदाम ओंबाळे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह सुभाष देशपांडे हे होते. सभेपूर्वी कार्यान्वित झालेल्या नळपाणी योजनेचे जलपूजन निर्मलाताई पंडित यांच्या हस्ते करण्यात आले.

नळपाणी योजनेमुळे गावातील पाणीप्रश्न सुटल्याबद्दल समाधान व्यक्त करून श्री. पंडित म्हणाले की, गावांमध्ये सध्या फक्त वृद्ध मंडळी रहात असून तरुण मंडळी रोजगारासाठी शहरांकडे गेली आहेत. या परिस्थितीत बदल करण्यासाठी गावाने जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज आहे. यासाठी फळबाग लागवड, बांबू लागवड व कोकणासारखा घरगुती पर्यटन व्यवसाय अशा पर्यायांचा आवर्जून विचार केला पाहिजे. यातून गावाची स्वतंत्र ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**पाणी टंचाई निवारण कार्यक्रम :** भोर तालुक्यातील मिरकुटवाडी (मळे) येथील विहिरीचे खोदकाम व बांधकाम या महिन्यात पूर्ण झाले आहे तर साळुंगण गावात शिवकालीन टाक्याची पुनर्बांधणी करण्याचे काम सुरू आहे. या कामासाठी केपीआयटी टेक्नॉलॉजीज ने आर्थिक मदत दिली आहे. वेल्हे तालुक्यातील डोपेखिंड (जाधववाडी) व पिंपरी (वाजेघर) या गावामध्ये विहीर खोदाईचे काम नुकतेच पूर्ण झाले आहे. गेळगाणे (कचरेवस्ती) आणि गुंजवणे (धनगरवस्ती) या ठिकाणी विहीर खोदकामास नुकतीच नव्याने सुरुवात झालेली आहे. इनरव्हिल क्लब ऑफ निगडी प्राईड यांनी पिंपरी (वाजेघर) येथील कामास अर्थसाहाय्य देऊ केले आहे.

## विस्तार कार्य

**बदलापूर केंद्र :** ज्ञान प्रबोधिनीचा विद्याव्रत उपक्रम सुरू असलेल्या शिशुविहार शाळेतील इयत्ता सातवीच्या मुलांचे विद्याव्रत उजळणी शिबिर सौर १९ ते २१ चैत्र (९ ते ११ एप्रिल) या तीन दिवसांत व पूर्वतयारीसाठी सौर दि. २२ चैत्र (१२ एप्रिल) रोजी बदलापूरजवळील कान्होर या गावातील श्री गजानन महाराज मंदिरात निवासी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

प्रत्यक्ष संस्कार सौर २३ चैत्र (१३ एप्रिल) रोजी संपन्न झाला. त्यासाठी वेल्ह्याहून प्रतिभाताई स्वामी व मंगलताई सुपे आल्या होत्या. संस्कारांसाठी एकूण सोळा व्रतार्थी उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून आलेल्या प्रतिभाताईने सरधोपट भाषण न करता उपस्थितांशी गप्पा, गोष्टी यातून संवाद साधला.

**ठाणे केंद्र –** बेडेकर शाळेत गंमत शिबिर- सौर २२ चैत्र (१२ एप्रिल) मुलांच्या परीक्षा संपल्यामुळे शिबिर घेण्याचे ठरवले. शिबिर घेण्यामागचा उद्देश मुले व मावश्या ह्यांच्यात जवळीक निर्माण व्हावी हा होता म्हणून गंमत शिबिर हे नाव देण्यात आले. शिबिराला एकूण चौदा मुले हजर होती. शिबिराची सुरुवात ॐकार व उपासनेने झाली. शिबिरात एकूण तीन प्रबोधन गीते घेण्यात आली. भारतीताई व अश्विनीताईंनी गोष्टी सांगितल्या. हस्त कौशल्यात वर्तमानपत्राचा वापर करून कचरापेटीसाठी पिशवी शिकवण्यात आली तसेच फुलदाणीही शिकवण्यात आली. मुलांनी हस्तकौशल्य खूप छान केले. जेवणानंतर भारतीताईंनी मुलांचे दोन गट पाडले व प्रत्येक गटाला विषय देऊन नाट्यअविष्कार करायला सांगितला. ह्या नंतर फ्रेमचा गेम घेण्यात आला. प्रथम मुलांना समजण्यास थोडा वेळ लागला पण नंतर त्यांना त्यातली मजा कळली.

भारतीताईंनी मुलांना सुट्टीत कोणकोणती पुस्तके वाचायची ह्याचे मार्गदर्शन केले व मुलांनी पुस्तके वाचावीत म्हणून शिल्पा मावशीने मुलांना बूकमार्क वाटले. मुलांना स्वत: भेळ करण्यास दिली. मुलांनी भेळेचे सर्व साहित्य चिरले नंतर भरपूर भेळ व सरबत पिऊन सर्व मुले तृप्त झाली. असा अनुभव त्यांनी प्रथमच घेतला होता म्हणून खूप मजेत होती. शिबिराचा शेवट प्रार्थनेने झाला. ह्या शिबिरामुळे नक्कीच मावश्या व मुलांमध्ये जवळीक साधली गेली.

## प्रज्ञा मानस संशोधिका

तैवान येथे झालेल्या International Research Association for Talent Development Excellence (IRATDE) परिषदेत 'प्रज्ञा विकास कार्यक्रमात पालकांचा सहभाग' या विषयावर स्वाती रानडे यांनी, 'उन्हाळी शिबिरातून मनोसामाजिक विकास' या विषयावर अश्विनी देशपांडे व 'वाचन संकल्पातून वाचन प्रेरणा कशी वाढते?' यावर संध्या खासनीस यांनी सादरीकरण केले.

The Indian Police Journal मध्ये 'Pain in the Uniform (Exploring the quality of life and life satisfaction among lady officers from CISF and ITBP and Police)' या विषयावर वा. अनघा लवळेकर, श्री. प्रमोद फळणीकर व कांचन पांडे यांचा संशोधन निबंध प्रसिद्ध झाला.

Indian Journal of Social Work मध्ये 'Gender Differences in Emotional and Moral Responses among Children' या विषयावर सुजाता होनप, वीणा शेपाळ व मृणाल परांजपे यांचा संशोधन निबंध प्रसिद्ध झाला.

अगस्त्य फौन्डेशन आयोजित कुप्पम, आंध्र प्रदेश येथे झालेल्या दोन दिवसीय बैठकीत सुजला वाटवे यांनी सहभाग घेऊन सरकारच्या शिक्षण नीती साठी "Gifted Education Policy' वर सल्ला दिला. CIIE, NIAS, Pravah इत्यादी संस्था त्यात सहभागी झाल्या होत्या.

## *शैक्षणिक उपक्रम संशोधिका*

**शिक्षक प्रेरणा जागृती वर्ग –** चतुरंग प्रतिष्ठान, मुंबई व ज्ञान प्रबोधिनी एकत्रितपणे गेल्या दोन वर्षांपासून चिपळूण येथे चिपळूण व आसपासच्या परिसरातील शाळांच्या शिक्षकांसाठी 'प्रेरणा जागृती वर्ग' हा निवासी वर्ग योजत आहे. या वर्गाचा हेतू शिक्षकांमध्ये प्रेरणा वाढवणे व त्यांनी शिक्षक म्हणून विविध कौशल्यांचे ज्ञान आत्मसात करून घेणे हा आहे. यावर्षी या वर्गाची दुसरी तुकडी पूर्ण झाली. यामध्ये ४० शिक्षक सहभागी होते. जून २०१८ मध्ये या वर्गाला सुरुवात झाली. एकूण पंधरा दिवसांचे नियोजन करण्यात आले होते. जून, नोव्हेंबर व एप्रिल असे विभागून या तुकडीचे निवासी वर्ग झाले.

सौर चैत्र १४ ते १६ (४, ५ व ६ एप्रिल) रोजी या तुकडीच्या शेवटच्या तीन दिवसांच्या टप्प्यात ४ तारखेला मातृभूमी परिचय सहली कशा योजाव्यात?, गटात काम कसे करावे?, वैयक्तिक व गटाचे संकल्प या विषयांची सत्रे झाली. ५ तारखेला कृतीसत्रांची विविधता, वेगळे शैक्षणिक प्रयोग, शिक्षणातून संस्कार या विषयांवर प्रबोधिनीतर वक्त्यांनी सत्रे घेतली. ६ तारखेला या तुकडीच्या वर्षभराच्या वर्गाचा समारोप झाला.

**सातारा प्रशिक्षण –** सौर चैत्र १९ व २० (९ व १० एप्रिल) रोजी रोटरी क्लब ऑफ वाई व ज्ञान प्रबोधिनी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सातारा येथे 'वर्ग व्यवस्थापन व प्रभावी अध्यापन' या विषयावर शिक्षकांचे प्रशिक्षण झाले. यासाठी न्यू इंग्लिश स्कूल, सातारा व परिसारातील अन्य अशा सहा शाळांतील ६० शिक्षक उपस्थित होते.

**करीमनगर प्रशिक्षण –** करीमनगर, हैद्राबाद येथे गेले वर्षभर प्रकल्प पद्धती या विषयावर शिक्षकांसाठी प्रशिक्षण चालू होते. सौर चैत्र २२ (१२ एप्रिल) या दिवशी वर्षभराच्या सत्रांचा समारोप झाला तसेच प्रकल्प सादरीकरण व त्याचे परीक्षण करण्यात आले. प्रशांत दिवेकर, नचिकेत नित्सुरे, मधुरा लुंकड यांनी परीक्षण केले. यामध्ये परामिताच्या सहा शाळांच्या शिक्षकांचा सहभाग होता.

**शैक्षणिक साधन केंद्र : दीक्षा प्रकल्प :** सौर फाल्गुन २२ व २३ (१३ आणि १४ मार्च) रोजी MSCERT आणि Columbia University for Sustainable Development Centre यांच्या संयुक्त विद्यमाने Student-centric digital content creation guideline for Maharashtra अशी कार्यशाळा घेण्यात आली. त्यात अनुभवी शिक्षक, बालभारतीचे तज्ज्ञ आणि दीक्षाच्या सहयोगी संस्था सहभागी होत्या. त्यामध्ये digital content तयार करण्यासाठीचे गुणवत्तेचे निकष या विषयवार लिहिण्याचे काम या कार्यशाळेत केले. यामध्ये पल्लवी पराडकर आणि रवींद्र गोडबोले सहभागी झाले होते.

**ज्ञान वाहिनी :** सौर फाल्गुन १४ आणि चैत्र २२ (५ मार्च आणि १२ एप्रिल) हे दोन दिवस पुणे प्रबोधिनी आणि Millennium National School या दोन शाळांतील चायनीज भाषा शिकणाऱ्या वीस मुलांचे AERSK Global Service Centre कंपनीच्या चेंगडू, चायना येथील अभियंत्यांनी चायनीज भाषा शिकवणारे तास घेतले.

दि. ९ एप्रिल रोजी जम्मूमधील एकोणीस शाळांतील ११वी आणि १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी भौतिक शास्त्र विषयातील करीयरसाठी मार्गदर्शन तास घेण्यात आला. डॉ. दीप्ती सिधये यांनी यांसाठी मार्गदर्शन केले आणि मुलांच्या प्रश्नांची उत्तरे दिली.

**विवेक इन्स्पायर :** सौर फाल्गुन ३ ते ९ (२३ ते २९ मार्च) या काळात इ. ७वी आणि ८वीची एकत्र शिबिरे झाली. अरुणाचलातील झिरो, रोईंग, बालीजान ह्या केंन्द्राच्या शाळांमध्ये आपल्याकडून अकरा जणांचा गट गेला होता. शिबिरांमध्ये स्थानिक व्यक्तींचे अनुभव कथन, विविध विषयांतील रसास्वाद आणि अवांतर वाचन असे विषय हाताळण्यात आले. या शिबिरात अरुणाचलातील २२ शाळांमधून सुमारे १३० मुलांची उपस्थिती होती.

## *छात्र प्रबोधन*

राज्यस्तरीय हस्तलिखित स्पर्धेचा निर्णय लागून सर्व शाळांना बक्षिसे पाठवण्यात आली.

स्पर्धेचा निर्णय पुढीलप्रमाणे : प्रथम क्रमांक –'पारिजात' ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी,

विभागवार बक्षिसे : १) नाशिक विभाग : 'ज्ञानयात्री' रचना विद्यालय, नाशिक २) अंबाजोगाई विभाग : 'लेखणीतून पडती मोती,' श्रीमती गो. कु. योगेश्वरी कन्याशाळा ३) बारामती : 'सृजनानंद' विद्याप्रतिष्ठानचे इंग्लिश मिडीयम स्कूल, बारामती स्पर्धेत उत्तम लेखन केलेल्या विद्यार्थ्यांना २८ ते ३० मे दरम्यान होणाऱ्या लेखन संपादन कार्यशाळेत विनाशुल्क सहभागी करून घेणार आहोत.

**यंदाच्या वर्षी छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक स्पर्धेत छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकाला (उत्कृष्ट बाल कुमार दिवाळी अंक) प्रथम क्रमांक मिळाला आहे.** तो स्व. सौ. कमलाबाई रसिकलाल धारीवाल यांच्या स्मरणार्थ दिला जातो.

**अखिल भारतीय प्रकाशक संघातर्फे छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकाच्या मुखपृष्ठास प्रथम क्रमांक मिळाला आहे.**

## *ज्ञान प्रबोधिनी, हराळी*

**पूरक शिक्षण :** किशोरी विकास – सौर चैत्र २५ व २६ (१५ व १६ एप्रिल) या काळात धानुरी, माकणी, सास्तूर व तोरंबा या चार गावातील किशोरी विकास प्रकल्पातील मुलींसाठी निवासी शिबिर घेण्यात आले. चार गावांमधील मिळून ३१ मुली या निवासी शिबिरात सहभागी झाल्या. मुलींमध्ये साहसी वृत्ती निर्माण व्हावी यासाठी विविध खेळ, कथाकथन, अनुभव कथन इत्यादी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराची सत्रे घेण्यासाठी पुणे केंद्रामधील तीन युवती तसेच सोलापूर केंद्रामधून श्वेताताई औरसंग आल्या होत्या.

**जलसंधारण –** सौर चैत्र १ (२२ मार्च) – जागतिक जलदिनानिमित्त सौर फाल्गुन २५ ते चैत्र २ (१६ ते २३ मार्च) जलसप्ताह घोषित करण्यात

आला होता. या निमित्ताने हराळी केंद्रावरील ग्रामविकसन विभाग व पूरक विभाग सदस्यांनी मिळून लोहारा व उमरगा तालुक्यातील तेरा शाळा व नऊ गावांमध्ये जल-जागृती कार्यशाळा घेतली. भूजलाबाबत जागृती चित्रफीत, काही खेळ, चर्चा आणि घोषणा इत्यादि उपक्रम या निमित्ताने घेण्यात आले. तसेच सौर चैत्र १ (२२ मार्च) या दिवशी उस्मानाबाद तालुक्यातील बुकनवाडी, गोरेवाडी व कावळेवाडी या गावांमध्ये जलदिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

**स्त्री शक्ती प्रबोधन** – सौर चैत्र २३ (१३ एप्रिल) रोजी हराळी केंद्रातील सर्व सदस्य व कार्यकर्त्यांसाठी 'कामाच्या ठिकाणी महिलांवरील लैंगिक अत्याचाराबाबत तक्रार निवारण कायदा व अधिकार' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सौ. स्नेहाताई गिरीधारी यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले. त्या कायदेतज्ञ असून स्विस-एड या संस्थेमध्ये काम करतात. तसेच त्यांच्या सल्ल्याने महिला तक्रार निवारण समितीचे गठन करण्यात आले.

## *नेतृत्व संवर्धन केंद्र, पुणे*

**उन्मेष २** – नेतृत्व पायाभरणी वर्ग विद्यार्थ्यांच्या उन्हाळी परीक्षांसाठी दिलेल्या सुट्टीनंतर सौर चैत्र १९ (९ एप्रिल) रोजी पुन्हा सुरू झाला. सौर चैत्र २२ ते २४ (१२ ते १४ एप्रिल) या कालावधीत वर्गाचे डॉ. आंबेडकर विचाराचे अभ्यास शिबिर झाले. यात चौदा विद्यार्थ्यांचा सहभाग होता. शिबिरात चार वाचन सत्रे, तीन गटचर्चा, चार व्याख्याने व एक चरित्र मांडणीचे सत्र झाले.

**अन्य –** अ) संकल्प व्याख्यानमालेचा पुढचा टप्पा पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात पार पडला. सौर चैत्र १ (२२ मार्च) रोजी झालेल्या या व्याख्यानमालेला सुमारे १५०-१७५ युवक व युवती उपस्थित होते. श्री. संतोष गोंधळेकर यांचे अनुभवकथन व श्री. सारंग साठये यांची मुलाखत झाली.

आ) सौर चैत्र २३ (१३ एप्रिल) रोजी परिवर्तन या संस्थेतून मा. तन्मय कानेटकर व अंकिता दिक्षित यांनी खासदार रिपोर्ट कार्ड वरती विद्यार्थ्यांशी चर्चा केली.'लोकशाही व्यवस्थेत लोक प्रतिनिधींच्या मूल्यमापनाची आवश्यकता' हा मुख्य विषय होता. मूल्यमापन कसे करावे या बद्दलचे चिंतन यांनी मांडले. यासाठी एकूण पंधरा विद्यार्थी उपस्थित होते.

## *ज्ञान प्रबोधिनी, प्रशाला*

**अध्यापक दिल्ली अभ्यास दौरा :** सौर चैत्र १० ते १५ (३१ मार्च ते ५ एप्रिल) या कालावधीत दिल्ली येथे प्रशालेतील चार व नवनगर विद्यालयातील सात अशा एकूण अकरा अध्यापकांचा अभ्यास दौरा झाला. दिल्ली मधील राजकीय प्रतिभा विकास विद्यालय, आरंभ विद्यालय, अरविंदाश्रमाच्या मिरांबिका, मदर्स इंटरनॅशनल स्कूल तसेच सरदार पटेल विद्यालय, शिक्षण संचालनालय-नवी दिल्ली, सल्वान पब्लिक स्कूल इ. संस्थांना भेट दिली. भेटी दरम्यान शाळांची कार्यपद्धती, उपक्रम व त्यांचे फलित या विषयी माहिती घेतली. शाळा-मुख्याध्यापक व शाळा-समन्वयक यांच्याशी संवाद साधला.

## *स्त्री शक्ती प्रबोधन (शहरी)*

**संवादिनी : मासिक बैठक** – मार्च महिन्यामध्ये वा. मनीषा शेटे यांचे 'निब्बान' (बौद्ध धर्मातील निवृत्तीची संकल्पना) या विषयावर व्याख्यान झाले. नव्या जुन्या ८० सदस्यांची उपस्थिती यावेळी होती.

**ओळख स्पर्शाची** –ओळख स्पर्शाची चे 'प्रशिक्षक प्रशिक्षण' सौर चैत्र २६ (१६ एप्रिल) रोजी झाले. एकूण २२ जणांनी यावेळी प्रशिक्षण घेतले. यामध्ये दहा संवादिनी सदस्यांचा समावेश होता.

## *युवक विभाग, पुणे*

**दुष्काळ निवारण** – आंबेडकर दलावरील २६ विद्यार्थी आणि दोन मार्गदर्शक यांनी गुंजवणी येथे श्रमदान केले. गेले सात रविवार चार महाविद्यालयीन दलांवरील मिळून किमान ४५ युवक वेल्ह्यामध्ये श्रमदानासाठी गेले आहेत. दोन जण हराळीमध्ये तर दोन जण अंबाजोगाईतील कामात सहभागी होत आहेत.

## *ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर*

**वाचकवीर व पुस्तक परिचय स्पर्धा** – सौर चैत्र ७ (२८ मार्च) रोजी आंतरशालेय पुस्तक परिचय स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ झाला. या स्पर्धेत दहा शाळांतील १७० विद्यार्थ्यांनी व २० अध्यापकांनी सहभाग घेतला. विशेष लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे व अध्यापकांचे तसेच प्रशालेतील वाचनाचे पृष्ठसंख्येचे उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांचे पारितोषिक देऊन कौतुक करण्यात आले.

**शिशु अध्यापिका विद्यालय :** सौर फाल्गुन २८ (१९ मार्च) रोजी पूर्व प्राथमिक विभागाने आयोजित केलेल्या गंमत जत्रा या उपक्रमात छात्राध्यापिकांनी सहभाग घेतला.विद्यार्थी निरीक्षण नोंदी, भाषा, गणित, इंद्रियविकास, जीवनव्यवहार, खेळ इ. विषयानुरूप मांडणी केली. अक्कलकोट तालुक्यातील शिरवळ येथील ३० अंगणवाडीताई-सेविका व मंद्रुप येथील पाच ताई या गंमत जत्रेत सहभागी झाल्या.

सौर चैत्र ५ (२६ मार्च) रोजी वेल्हा येथील आंबवणे या गावी बालवाडीताईंना पाठ प्रात्यक्षिक कसे घ्यावयाचे यासाठी चार छात्राध्यापिका व सौ. मेघनाताई गेल्या होत्या. यावेळी भाषा विषयातील परिचय तबक व अभिनयगीत, हस्तव्यवसाय, इंद्रियविकास, गणित इ. पाठ प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले.

## *ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे*

**पर्यावरणपूरक होळी :** विद्यार्थ्यांच्या मनात पर्यावरणविषयक जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने विद्यालयात पर्यावरणपूरक होळी करण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांनी परिसरातील पालापाचोळा गोळा केला व त्यामध्ये प्रत्येक मुलाने छोट्या कागदावर आपल्यातील असणारे वाईट गुण, विचार त्यावर लिहून ते होळीत दहन केले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण विषयक महत्त्व विविध गोष्टीतून सांगितले.

## *जिजामाता दल*

सौर चैत्र २० (१० एप्रिल) रोजी संचालक भेट झाली. मा. संचालकांनी ज्ञान प्रबोधिनीचे जे चालू विभाग आहेत त्यांची माहिती सांगितली. जे विभाग चालू आहेत त्यामध्ये आपण एक निश्चित धोरण ठरवून कोणत्या प्रकारचे काम करायचे, त्याच्या स्थापनेपासून ते पुढे कसे वाढविता येतील, त्याचा विस्तार कसा करता येईल ते सांगितले.

## *संत्रिका*

**व्याख्यान**- सौर चैत्र १५ (५ एप्रिल) रोजी इंदिरा महिला बचत गट, घोरपडे पेठ, खडक माळ आळी, पुणे येथे संत्रिका पुरोहिता उर्मिला बेटकर यांचे 'गुढीपाडवा' या विषयावर व्याख्यान झाले. ७० ते ८० महिलांचा गट होता.

**अन्य** - प्रज्ञा मानस संशोधिकेकडून १० व १२वी च्या विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी घेतला जाणारा 'ॲप्टीट्यूट टेस्ट' हा उपक्रम सौर चैत्र १७ व २२ (७ व १२ एप्रिल) रोजी 'मुंबादेवी तरुण मंडळ, साई गाव पालखी सोहळा, कोपरगाव, यांच्या वतीने घेण्यात आला ४२ जणांनी या टेस्टचा लाभ घेतला. संत्रिकेच्या उज्ज्वला पवार यांचा हा उपक्रम योजण्यात सहभाग होता.

## *स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण)*

**आरोग्य सखी :** जानेवारी पासून सुरू झालेल्या या प्रकल्पाचे या महिन्यात भरीव काम झाले. प्रकल्पा अंतर्गत गावात जाण्यासाठी जीप खरेदी केली. त्यात जागृतीच्या कार्यक्रमात 'ओळख स्पर्शाची' ही कार्यशाळा २०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांसाठी घेतली, ३४ जणींपर्यंत सॅनिटरी पॅड वापरा विषयी तपशीलात बोलणे झाले. तपासणी अंतर्गत दाताची तपासणी दोन वेळा झाली त्याला डॉ. वैदेही व डॉ. अनुजा आल्या होत्या. आता आपण नवीन खुर्ची व एक्स-रे मशीनची सोय केल्यामुळे रूट कॅनल करणे शक्य झाले आहे. त्या शिवाय साखर येथे ३२ जणींची गरोदर माता तपासणी झाली. डॉ कानिटकर यांनी कॅन्सर जागृती व तपासणी हिरपूडी, विहीर व मार्गासनी गावात केली. या वेळी एका तपासणीला वेल्ह्यातल्या डॉ. पाटील मदतीला आल्या होत्या. डोळे तपासणी साखर गावात घेतली, कातकरी वस्तीवर सर्वसामान्य आरोग्य तपासणी घेतली. त्यात ६३ पेशंट तपासले. त्यासाठी डॉ. मुदगिरीकर आल्या होत्या. सर्व तपासणी करायला आलेल्या डॉक्टर स्वेच्छेने येतात हे फार महत्वाचे! प्रकल्पाच्या तिसऱ्या भागात आपण किशोरी मेळावे घ्यायचे ठरवले होते त्याचे प्रशिक्षक प्रशिक्षण झाले. त्याला एकूण ३० जणी आल्या होत्या. त्यात सतरा युवती व तेरा हिरकणी होत्या. त्यांनी सहा गावात मेळावे घेतले ज्यात १७९ विद्यार्थी सहभागी झाले होते.

**स्वावलम्बी गाव :** श्री सेटलवाड यांच्या देणगीतून या वर्षी सुरू झालेल्या या प्रकल्पा अंतर्गत आपण सहा गावे निवडली आहेत. त्यातल्या काही गावात या महिन्यात झालेल्या उपक्रमापैकी महत्त्वाचे म्हणजे वडगावला गाव पातळीवर शिवण वर्ग घेतला, तो पूर्ण झाला त्याचे प्रमाणपत्र वाटप झाले. गावात ज्येष्ठांची डोळे तपासणी झाली. त्याला ६२ गावकरी आले होते. त्यापैकी २२ जणांना मोतीबिंदूचे ऑपरेशन करणे गरजेचे आहे असे सांगितले. त्यापैकी पाच जण लगेच शिरवळच्या आपल्या रुग्णालयात गेले.

तसेच सगळ्या गावांसाठी एक महिना कालावधीचा बाल संस्कार वर्ग प्रशिक्षक प्रशिक्षण योजला होता. हा वर्ग आंबवणे येथे झाला

## *ज्ञान प्रबोधिनी, निगडी*

**प्राथमिक मराठी :** विभागाच्या पालक व शिक्षकांनी सौर फाल्गुन २५ (१६ मार्च) रोजी अलिबाग (किहिम सागर किनारा) येथे सहल योजली होती. सागर किनारा स्वच्छ करणे आणि प्लॅस्टिक संकलन करून त्यामागचे महत्त्व नव्या पिढीला पटवून देणे या उद्देशाने अलिबाग येथील वडके विद्यालयातील माध्यमिकच्या मुलांशी अध्यापक व पालक गटाने संवाद साधला. प्रत्यक्ष स्वच्छतेची प्रतिज्ञा दिली. तसेच किनाऱ्यालगत प्रत्यक्ष स्वच्छ्ता केली. जनजागृती करण्यासाठी माहिती पत्रके वाटली. यामध्ये ४६ पालक आणि सहा शिक्षकांनी सहभाग घेतला.

**पूर्व प्राथमिक विभाग :** बालचमूंसाठी सौर चैत्र २० (१० एप्रिल) रोजी त्यांना निखळ आनंद मिळावा या उद्देशाने गंमत जत्रेचे आयोजन करण्यात आले होते. वर्गांमध्ये खास खेळांची मांडणी करण्यात आली होती. यामध्ये तळमजल्यावर मुलांनी टॅटू काढण्याचा आनंद घेतला. एका वर्गात मेथी, शेंगदाणे, पीठ, डाळ, कणिक असे साहित्य वापरून सोलणे कुटणे निवडणे लाटणे तळणे अशा विविध कामांचा आनंद घेतला तर एका वर्गात मुलांना हव्या त्या चित्रावर कुंदन टिकल्या इ. साहित्य चिकटवण्याचा मनसोक्त आस्वाद घेता आला. तर एका वर्गात कागदी पेले वापरून मनोरा करणे, चिमटे लावणे, ठोकळे जोडणे, बाटलीत वाळू भरणे अशा एका मिनिटांच्या खेळांचा मनसोक्त आनंद घेतला. जत्रेचे मुख्य आकर्षण होते ते jumping micky mouse. मैदानावर खास मुलांसाठी याचे आयोजन केले होते. त्यावर भरपूर खेळण्याचा आनंद मुलांनी घेतला. प्रत्येक वर्गातील मुले प्रत्येक खेळण्याचा आनंद घेतील असे नियोजन होते. जाताना स्वतः बनवलेली कलाकृती घेऊन व खाऊ खाऊन मुले आनंदाने घरी गेली.

---

# सौर चैत्र १९४१ मधील उपक्रमांची प्रकाशचित्रे



युवक विभाग, पुणे
वर्षांत समारंभ व प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रम



संवादिनी, पुणे : ओळख स्पर्शाची प्रशिक्षण



नळ पाणी योजनेचे उद्‌घाटन करताना मा. रवि पंडित



नळ पाणी योजना उद्‌घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना
मा. रवि पंडित

छात्र प्रबोधन राज्यस्तरीय हस्तलिखित स्पर्धेत
अंबाजोगाई विभाग : 'लेखणीतून पडती मोती,'
श्रीमती गो. कु. योगेश्वरी कन्याशाळेचे विद्यार्थी →





ज्ञान प्रबोधिनी, अंबाजोगाई : व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरात लघुचित्रपट बघताना विद्यार्थी
←